केले.

# सौ.र.ना. देशमुख महाविद्यालय भडगाव

▸▸ भडगाव । प्रतिनिधी

येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रंथालय व व जयंती- पुण्यतिथी समितीच्या वतीने झूम मिटींगच्या माध्यमातून संयुक्तपणे हे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी वक्ते म्हणून पुणे येथील प्रा.डॉ.शाकीर शेख यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे चरित्र व कार्य यांच्यावर प्रकाश टाकला. त्याचबरोबर वाचनाचे मानवी जीवनातील महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. जेवढे अधिक पुस्तके आपण वाचू तेवढे आपले आयुष्य अधिकाधिक संपन्न होईल. केवळ पुस्तके असून चालणार नाही, तर ती वाचावी लागतील, त्यावर चिंतन-मनन करावे लागेल आणि त्या पुस्तकांमधील विचार आपल्या आयुष्यामध्ये आचरणात आणावे लागतील. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी जे महत्त्वपूर्ण कार्य केले त्याचा त्यांच्या लेखनामधून आपल्याला प्रत्यय येतो. एक उच्च चारित्र्याचा व असामान्य प्रतिभेचा वैज्ञानिक आपल्या देशाला राष्ट्रपती म्हणून लाभला. म्हणूनच त्यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरे करणे निश्चितच प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन डॉ.शाकीर शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ. एन.एन. गायकवाड होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनील शेलार यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.जी.एस. अहीरराव यांनी केले. विद्यार्थी विकास अधिकारी व उपप्राचार्य प्रा.एस. आर पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचारी अशा एकूण ६५ जणांनी झूम मिटिंगच्या माध्यमातून उपस्थिती दिली.

# देशमुख महाविद्यालयात आझाद यांना अभिवादन



प्रतिनिधी | भडगाव

येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे प्रथम शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती राष्ट्रीय शिक्षण दिवस म्हणून साजरी करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या प्रारंभी मौलाना आझाद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी नितीन महाजन उपस्थित होते. या वेळी डॉ. अतुल देशमुख यांनी मौलाना आझाद यांच्या कार्यकर्तृत्वाचा आपल्या भाषणातून आढावा घेतला. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनांचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनील शेलार यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी मौलाना आझाद यांचे भारतीय शिक्षण क्षेत्रातील योगदान अधोरेखित केले. सूत्रसंचालन जयंती- पुण्यतिथी समितीचे अध्यक्ष प्रा. जी. एस. अहिरराव यांनी तर प्रा. शिवाजी पाटील यांनी आभार मानले.

## अमळनेर काँग्रेसतर्फे आझाद यांना वंदन

**अमळनेर | काँग्रेस आयच्या** शहर व तालुका अल्पसंख्याक विभागातर्फे जयंती निमित्त मौलाना आजाद अभिवादन करण्यात आले. या वेळी ॲड. रज्जाक शेख व मुन्ना शर्मा यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी मुन्ना शर्मा, नगरसेवक सलीम टोपी, जिल्हा सरचिटणीस अ. रज्जाक शेख, अहेमद पठाण, तालुकाध्यक्ष अलीम मुजावर, शहराध्यक्ष जुबेर पठाण, युवक अध्यक्ष तौसिफ तेली, सईद तेली, अस्लम पठाण आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## भडगाव
## ठाण्या
## निरीक्ष

भडगाव
ठाण्याचे
धनंजय ये
कार्यकाळ
जिल्हा
प्रवीण मु
जळगाव
तालुक्याती
रिक्त प
आली. त
शहर पोलि
आलेले पो
रावजी उ
केली आ
आपला पद
त्यांच्यासाठी
हा नवीन
जामनेर, का
येथे सेवा ब

# मौलाना अबुल कलाम आझाद जयंतीनिमित्त अभिवादन!

## सौ. र. ना. देशमुख महाविद्यालय

**▸▸ भडगाव । प्रतिनिधी**

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे प्रथम शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती राष्ट्रीय शिक्षण दिवस म्हणून साजरी करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात सुरुवातीला मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एन. गायकवाड होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी नितीन महाजन उपस्थित होते.

यावेळी डॉ. अतुल देशमुख यांनी मौलाना १४ वर्षांपर्यंत सक्तीचे शिक्षण व मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य असे अत्यंत महत्त्वाचे निर्णय त्यांनी आपल्या शिक्षणमंत्रीपदाच्या काळात घेतले. त्यामुळे भारतीय शिक्षणाला एक आधुनिक चेहरा लाभला. त्यांचे हे योगदान आपला देश कधीही विसरू शकत नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनील शेलार यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी मौलाना अबुल कलाम आझाद यांचे भारतीय शिक्षण क्षेत्रातील योगदान अधोरेखित केले. सूत्रसंचालन जयंती- पुण्यतिथी समितीचे अध्यक्ष प्रा.जी.एस. अहिरराव यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. शिवाजी पाटील यांनी केले.

## धनाजी नाना महाविद्यालय

**▸▸ फैजपूर, ता.यावल । वार्ताहर**

कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी विकास विभागाचे सहाय्यक अधिकारी डॉ. नितीन चौधरी उपस्थित होते. तसेच प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कासोदा

**▸▸ कासोदा, । वार्ताहर**